# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 04/01/2020 (शनिवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 0.5 कि.मी अंतरावर मौजा देवलापार येथे दिनांक 02/01/2020 ते दिनांक 03/01/2020 चे 22:00 वा. ते 07:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– किशोर रामलाल जयस्वाल, वय 66 वर्ष, रा. वार्ड क्र. 2, देवलापार हे दुकानाला कुलूप लावून घरी गेले होते. दरम्यान फिर्यादींच्या दुकानाच्या भिंतीला अज्ञात आरोपीने छिद्र करून आत प्रवेश केला. तसेच आरोपीने दुकानात ठेवलेल्या किराणा सामानातुन 1) 4 पाम तेलाचे डब्बे किंमती 6,000/–रू., 2) 4 सोयाबीन तेलाचे डब्बे किंमती 6,000/–रू., 3) 1 पेटी सोयाबीन तेल पाकीट किंमती 1,000/–रू. व 4) नगदी चिल्लर एकुण 2,000/–रू. असा एकुण किंमती 15,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार विनायक नागुलवार हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 2 कि. मी अंतरावर मौजा कळमना ते उमरेड कळमना फाटा येथे दिनांक 29/12/2019 चे 15:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. सुकेशनी योगेश रामटेके, वय 29 वर्ष, रा. आनंदनगर झागरीपुरा, नागपूर या मुलांसोबत मौजा कळमणा येथुन नागपुर जाण्यास ऑटोत बसुन उमरेडला जात होत्या. दरम्यान ऑटोत बसलेली संशयीत आरोपी नामे– माधुरी डंभारे, रा. कळमना हिने फिर्यादीच्या बॅगमध्ये ठेवलेली दागिण्याची डब्बी त्यामध्ये सोन्याचे मंगळसुत्र सोन्याची नथ, सोन्याची गाठी असा एकुण कि. 60,500/–रू. चा चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि राठोड या करीत आहे.

# दुखापत

1) पो.स्टे. मौदा:– अंतर्गत 16 कि. मी अंतरावर सेलु, ता. कामठी येथे दिनांक 02/01/2020 चे 19:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अक्षय भारत वंजारी, वय 22 वर्ष, रा. सेलु, ता. कामठी यांनी आरोपी नामे– प्रणय हिरामण कुंभलकर, वय 20 वर्ष, रा. सेलु ता. कामठी याला म्हणाले की, ''तुने माझ्या गाइच्या खान्याची तनस(चारा) माझ्या घरून आणुन तुने शेकोटीत का पेटविले?'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून हातबुक्याने मारहाण करून फिर्यादीला जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 10 कि. मी. सिल्लेवाडा येथे दिनांक 03/01/2020 चे 09:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मंगेश तुकाराम गुरव, वय 34 वर्ष, रा. सिल्लेवाडा वार्ड क्र. 05 व आरोपी नामे– सागर गुडेराव शेंडे, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्र 12 सिल्लेवाडा हे दोघेही एकाच गावातील रहीवासी असुन आरोपीने जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीसोबत वाद घातला. तसेच आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून लाकडी काठीने त्याचे उजव्या हाताच्या अंगठयाला मारहाण करून जखमी करून अंगठा फ्रॅक्चर केला. तसेच आरोपीने फिर्यादीस पुन्हा पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बाबापोषाक मेश्राम हे करीत आहे.

3) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि. मी. पारडसिंगा येथे दिनांक 03/01/2020 चे 17:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेंद्र बळीरामजी बोढाळे, वय 60 वर्ष, रा. पारडसिंगा याने आरोपी नामे– शिवलाल प्रेम विश्वकर्मा रा, पारडसिंगा यास म्हटले की, ''माझ्या गायीने तुझे काय नुकसान केले, तु माझी गाय का सोडली,'' या कारणावरून आरोपीने हातात दगड घेवुन फिर्यादीच्या तोंडावर मारले त्यामुळे वरच्या जबडयाचा एक दात व खालच्या जबडयाचे दोन दात पडले व खांदयावर मुका मार लागुन ते गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 325 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरून भेंडे हे करीत आहे.

4) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि. मी. पारडसिंगा येथे दिनांक 03/01/2020 चे 17:00 वा. दरम्यान आरोपी नामे– सुरेंद्र बळीरामजी बोढाळे, वय 60 वर्ष, रा. पारडसिंगा याने गाय इलेक्ट्रीक पोलला बांधली असता फिर्यादी नामे– शिवलाल प्रेम विश्वकर्मा, वय 60 वर्ष, रा, पारडसिंगा यांचे दोन्ही लहान मुल असल्याने फिर्यादीने बांधलेली गाय सोडून टाकली त्यामुळे आरोपीने म्हटले की, ''माझी गाय का सोडली,'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून काडीने मारहाण जखमी झाले. तसेच आरोपीने फिर्यादीस पुन्हा पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरून भेंडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर